प्रेस नोट

दि.२५.७.२०१८

**पुणे रेल्वे स्टेशन ,हडपसर व लोणी येथील वाहने चोरणाऱ्यास स्थानिक गुन्हे शाखा लोहमार्ग पुणे यांनी केले जेरबंद**

..................................................................................

पुणे रेल्वे स्टेशन परिसरामध्ये झालेल्या वाहनचोरीच्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखा तपास करीत असताना पो.हवा.संजय सोनवणे व पो.ना.संतोष चांदणे यांना मिळालेल्या खबरीवरुन पुणे रेल्वे स्टेशन येथील पार्कीगमधुन विष्णु भाऊराव कुंडगिर ,वय १९ वर्षे धंदा. वाडी काम रा.मारुती मंदीराजवळ ,खेर्डा ,ता.उदगिर ,जि.लातुर .सध्या.पुणे फिरस्ता यास ताब्यात घेवुन त्यांच्याकडे तपास केला असता त्याने प्रशांत सुरेश राऊत ,वय ४१ वर्षे धंदा. नोकरी ,रा.फ्लॅट नं.टि.व्ही २०१ ,स्वर विहार हौसींग सोसायटी ,डि मार्ट जवळ ,ससाणे नगर ,हडपसर ,जि.पुणे मो.नं ९८८१३१८३५८ हे दि. ६.०७.२०१८ रोजी संध्याकाळी १९.१५ वा.पुणे रेल्वे स्टेशन समोर झाडाखाली गाडी लावुन पुणे ते हडपसर गाड्यांची चौकशी करण्यासाठी गेले असता त्यांची २०,००० रु किमतीची काळया रंगाची अॅक्टीव्हा गाडी चोरुन नेल्याचे सांगितले. त्याप्रमाणे **पुणे लो.पो.ठाणे गु.र.नं.७७६/२०१८ ,भा.द.वि.३७९** या गुन्हयात त्यास दि.१४.७.२०१८ रोजी ११.४५ वा.अटक करुन त्याच्याकडुन या गुन्हयातील अॅक्टीव्हा मोटार सायकल जप्त करण्यात आली आहे.

आम्ही आरोपीकडे आणखी कसुन तपास केला असता त्याने फिर्यादी नामे शंकर दिगंबर देवकर ,वय ४८ वर्षे धंदा. व्यवसाय ,रा.२०१ ,नवी खडकी ,येरवडा .जि.पुणे हे दि. दि.१५/२/२०१८ रोजी ००.३० वा.पुणे रेल्वे पोलीस ठाणेच्या समोरील बाजुस त्यांची ६०,००० रु किमतीची अॅक्सेस मोटार सायकल लावुन मस्तानी बाबा यांच्या दर्शनासाठी गेले असता त्यांची मोटार सायकल चोरुन नेलेबाबत कबुली दिली.त्याप्रमाणे त्यास **पुणे लो.पो.ठाणे गु.र.नं.२३२/२०१८ ,भा.द.वि.३७९** या गुन्हयात अटक करण्यात आली आहे.व त्याच्याकडुन गुन्हयातील चोरीस गेलेली अॅक्सेस मोटार सायकल जप्त करण्यात आली आहे.

यातील आरोपीकडुन पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे येथील वरील दोन गुन्हयातील **२०,००० रु किमतीची काळया रंगाची अॅक्टीव्हा मोटार सायकल व ६०,००० रु किमतीची पांढऱ्या रंगाची अॅक्सेस मोटार सायकल** जप्त करण्यात आली आहे.तसेच इतर मालामध्ये आरोपीकडून ४०,००० रु ,किमतीच्या दोन स्पेंडर मोटार सायकल जप्त करण्यात आल्या असुन त्याबाबत लोणी व हडपसर येथे गुन्हे दाखल आहेत.या आरोपीकडुन **१,२०,००० रु एकुण किमतीच्या चार मोटार सायकली** जप्त करण्यात आल्या आहेत.त्यांच्याकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

पुणे लोहमार्ग जिल्हयाचे मा. पोलीस अधिक्षक सो तुषार पाटील साहेब यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक अनिल दबडे सो पो.उप.निरीक्षक बबन गायकवाड ,पो.हवा.सुनील सोनवणे ,पो.हवा.अनिल दांगट ,पो.ना.संतोष चांदणे ,पो.ना.अमरदिप साळुंके ,पो.ना.जनार्दन गर्जे ,पो.कॉ.पवन बोराटे ,पो.कॉ.ज्ञानेश्व सुर्यवंशी,पो.कॉ.अमीत गवारी ,चालक पो.ना.जगताप व पो.कॉ.खोत यांनी सदरची कामगिरी केली आहे.पुढील तपास पो.उप.निरीक्षक बबन गायकवाड करीत आहेत.